महाराष्ट्र शासन

## सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पुणे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसोर,येरवडा, पुणे-०६

दुरध्वनी क्रमांक: ०२०-२९७०६६११ E-mail : acswopune@gmail.com

जा.क्र.संआसकपुणे/भासशि/against cap scholarship/२०२०-२१/ १०४८ दि.०३.०५.२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व महाविद्यालये (पुणे जिल्हा)

विषय :- भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परिक्षाद्वारे (कॅप) प्रवेश घेतल्या असल्याबाबतच्या अटींची सक्ती न करणेबाबत

संदर्भ :- १. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/कॅप राऊंड/सक्ती/ २०१५-१६/४६२ दि.०६.०२.२०१६
२. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे शासनपत्र शिष्यवृत्ती-२०१७/प्र.क्र.१३/शिक्षण दि.०१.०६.२०२०

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये केंद्र पुरस्कृत अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेसाठी विद्यार्थ्याने कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश घेताना तो सामाईक प्रवेश परिक्षाद्वारे (कॅप) घेतला असला पाहिजे अशी सक्ती करण्यात येवू नये असे कळविण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र. २ चे शासनपत्राद्वारे ज्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- (रु. एक लाख रुपये फक्त) पर्यत असेल त्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षेची (कॅप) सक्ती करण्यात येऊ नये असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Scholarship) साठी अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परिक्षाद्वारे (कॅप) प्रवेश घेतल्या असल्याबाबतच्या अटींची सक्ती करण्यात येवू नये.

**सदर बाब केवळ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) साठी लागू आहे.** शासन निर्णय क्र. इबीसी-२०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण-१ दि. ३१ मार्च २०१६ नुसार शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना (Freeship) साठी व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला असल्याचे CAP Allotment Letter सादर करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

(संगिता एन.डावखर)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
१. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१
२. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१
३. मा. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे - ०६